




- वरील बचत गटापासून प्रेरणा घेवून काही महिलांनी एकत्र येवून ज्युट बॅगा तयार करण्याचा बचत गट स्थापन केला. वनविभागाने यासाठी सुद्धा महिला बचत गटास बीज भांडवल उपलब्ध करून दिले तसेच तयार केलेल्या बॅगा विक्री करण्याचे स्त्रोत उपलब्ध करून दिले. आजमितीस तयार केलेल्या ज्युट बॅगा नाईक फाऊंडेशन यांच्या माध्यमातून परदेशात विक्रीसाठी जात आहेत.




## वनांचे संरक्षण व संवर्धन :-

वनविभागाने वरीलप्रमाणे ग्रामस्थांना मदतीचा हात दिल्याने ग्रामस्थांमध्ये वनाबाबतचे महत्व वाढले. त्यांनी स्वत:हून पुढाकार घेवून वनसंरक्षण व संवर्धन करण्यास सुरूवात केली. मागील दोन वर्षापासून जंगलास वनवणवा लागलेला नाही. तसेच ग्रामस्थांच्या दक्षतेमुळे अवैध वृक्षतोडीस आळा बसला आहे. साहजिकच जंगलामध्ये वन्यजीवाचा अधिवास वाढला आहे. ग्रामस्थांनी श्रमदानातून नैसर्गिक पुर्ननिर्मितीची कामे म्हणजेच मौल्यवान प्रजातींच्या फुटव्याची वाढ होण्यासाठी अनावश्यक वेलताणे तोडून उत्तम प्रतीचा फुटवा राखला आहे. भविष्यात यापासूनच वनसंपदेत वाढ होण्यास मदत होणार आहे.



## जल व मृदसंधारणाची कामे :-

वनविभागाने ग्रामस्थांना पाणलोट विकासाचे महत्व पटवून देवून त्या अनुषंगाने होणाऱ्या फायद्याची जाणीव करून दिली. या गावाच्या वनक्षेत्रात डोंगरमाथ्यापासून ते पायथ्यापर्यंत जलसंधारणाची कामे करण्यात आली. या अंतर्गत वनक्षेत्रात जलशोषक चर खोदणे, दगडाच्या सहाय्याने घळनियंत्रण बांधाची कामे करणे, पावसाळा संपल्यावर लगेच वनराई बंधारे बांधणे इ. कामे करण्यात आली. यामुळे गावातील जलस्त्रोताचे बळकटीकरण झाल्याने जमिनीतील भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ झाली आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर होण्यास मदत झाली आहे.




**संयुक्त व्यवस्थापन कार्यक्रम राबविल्यामुळे लालठाणे गावाच्या आर्थिक विकासाचा प्रवास सुकर झाला आहे.**

# संयुक्त वनव्यवस्थापनाची धरली कास लालठाणे गावाचा झाला विकास !









**डहाणू वन विभाग**

**संयुक्त वनव्यवस्थापन समिती लालठाणे**

लालठाणे गाव हे पालघर या जिल्हा मुख्यालया पासून २५ कि.मी. अंतरावर आहे. लालठाणे हे एक मुख्य गाव असून त्यामध्ये पिंपळपाडा व पाटीलपाडा या दोन पाडयांचा समावेश आहे. लालठाणे गावाची लोकसंख्या ८९३ एवढी आहे. या गावात बहुसंख्य लोक हे अनुसूचित जमातीतील वारली समाजाचे असून ते एकूण लोकसंख्येच्या ७० टक्के आहेत. त्यांचे दैनंदिन जीवन प्रामुख्याने वनावर अवलंबून आहे. या गावाचे भौगोलिक क्षेत्र ४१६.७६ हेक्टर असून त्यापैकी २९७.६०५ हेक्टर वनक्षेत्र आहे.



लालठाणे गावातील वनजमिन बेसुमार वृक्षतोडीमुळे ओसाड दिसत होती. दरवर्षी लागणाऱ्या वनवणव्यामुळे जंगलाचे अतोनात नुकसान होत होते. अनिर्बंध चराईमुळे वनक्षेत्राचा ऱ्हास झाला होता. जंगल भागात वनराई नसल्यामुळे पाण्याची पातळी खाली जाऊन पिण्याच्या पाण्याची टंचाई भासू लागली होती. तसेच एका बाजूस जळावू सरपणाचा यक्ष प्रश्न त्यांचे समोर उभा राहिला होता.

याचा सारासार विचार करून वनकर्मचाऱ्यांनी गावातील ग्रामस्थांशी सल्लामसलत करून त्यांना सन २००३ च्या शासन निर्णयाची माहिती दिली. सदर शासन निर्णयातील तरतुदींचे ग्रामस्थांनी स्वागत करून वनविभागाच्या सहाय्याने दि. १०/०२/२००७ रोजी संयुक्त व्यवस्थापन समितीची स्थापना केली.

वनसंरक्षण समितीच्या सदस्यांनी प्रथम कुऱ्हाडबंदी, चराईबंदीचा निर्णय घेतला. या निर्णयानुसार ग्रामस्थ गावासाठी लागणारा चारा व सरपण हे जंगलाला इजा न पोहचता स्थानिक वनअधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली गोळा करून आपल्या गरजा भागवत आहेत. वनाचे महत्व लोकांना पटल्यामुळे त्यांनी वनक्षेत्रामध्ये वाढ होण्यासाठी सन २०१२ मध्ये २५ हेक्टर वनक्षेत्रावर रोपवन घेतले. लोकांच्या सहयोगाने सदर रोपवन आजमितीस यशस्वी झालेले आहे.

उपवनसंरक्षक डहाणू व सहाय्यक वनसंरक्षक पालघर यांनी मौजे लालठाणे येथे दिनांक २६/१२/२०१३ रोजी या गावात ग्रामस्थांबरोबर एक चर्चासत्र आयोजित केले त्यात संयुक्त वनव्यवस्थापन कार्यक्रम प्रभावीपणे राबविणेसाठी विविध विषयांवर विचारविनीमय करण्यात आला. संयुक्त वनव्यवस्थापनाच्या माध्यमातून ग्रामस्थांनी आपल्या आर्थिक उन्नतीसाठी खालील प्रमाणे कार्यक्रम वनविभागाच्या मार्गदर्शनाखाली राबविणेचे ठरविले.

## परस बागेसाठी फळझाडे वाटप :-

ग्रामस्थांच्या परस बागेस संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या पुढाकाराने सन २०१५ च्या पावसाळयात नारळ व काजू या फळझाडांचे वाटप करण्यात आले. यांचा उद्देश त्यांना प्रचुरयुक्त अन्न मिळणे हा आहे. तसेच सदरची फळे विकून त्यांना स्वयंरोजगार मिळणेस हातभार लागणार आहे. पुढच्या पावसाळयात त्यांना आंबा, चिंच व शेवगा यांची रोपे वाटप करण्यात येणार आहेत.



## दुग्धव्यवसाय :-

लालठाणे गावातील बिगर आदिवासी तरूणांनी एकत्र येवून श्रीगणेश पुरूष दुग्ध संकलन व उत्पादन संघ सन २०१३ रोजी स्थापन केला. संघातील तरूणांनी दुग्धत्पादनात वाढ व्हावी, दूध संकलन मोठया प्रमाणात व्हावे म्हणून वनविभागाच्या सहाय्याने बँकेकडून कर्ज घेतले. सद्यस्थितीत हा कर्ज पुरवठा झाल्याने त्यांच्या व्यवसायाचा विस्तार होऊन दुधाचे उत्पादनात प्रतीदिन १५० लिटर पासून ५०० लिटर वाढ झाली. गावात दुध संकलन केंद्र आल्याने लालठाणे व आजूबाजूच्या गावात दर पंधरवाडयाला १ ते २ म्हशींची वाढ होत आहे. त्यामुळे संकलन केंद्राची दुधाची आवक ३५० लिटर वरून १००० लिटर पर्यंत झाली आहे.



वरील संघाचा झालेला उत्कर्ष बघून स्थानिक आदिवासी तरूणांनी सुद्धा दुग्धत्पादनाचा गट स्थापन केला. प्रथम: त्यांनी श्रमदानाने दुग्धव्यवसायासाठी गोठा बांधून तयार केला. सदर बचत गटास वनविभागाच्या प्रयत्नाने मे. कृष्णा वृंदावन प्रतिष्ठान यांचेकडून १० लाख अर्थ सहाय्य उपलब्ध करून दिले. त्यामुळे सद्यस्थितीत त्यांचेकडे दुभत्या १४ म्हशी असून त्यापासून प्रतिदिन १०० लिटर दूध उत्पादन होत असून गावातील संकलन केंद्रात प्रती लिटर ५० रूपये दर मिळत आहे. त्यामुळे त्यांच्या दैनंदिन जीवनात बऱ्याच प्रमाणात सुधारणा झाली आहे.



## महिलांचे सक्षमीकरण :-

- वनहक्क प्लॉटमध्ये भाजीपाला व फुलाची लागवड

वनविभागाच्या सहाय्याने आदिवासी महिलांना स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा म्हणून त्यांनी प्रथम: महिला बचत गटाची स्थापना केली. सदर बचत गटाच्या श्रमदानातून तसेच वनविभागाच्या सहकार्याने वनराई बंधारे बांधण्यात आले. तसेच गांडूळ खताचा प्रकल्प उभारण्यात आला. भाजीपाला व मोगरा तसेच झेंडू फुलाची लागवड होणे कामी संयुक्त व्यवस्थापन समिती मार्फत बीज भांडवल उपलब्ध करून दिले. त्यानुसार भाजीपाला व फुलांचे उत्पादन करून नजीकच्या बाजारात विक्री केल्यामुळे त्यांच्या दैनंदिन गरजा भागण्यास हातभार लागत आहे.